**प्रेस नोट** **दि.१८/०७/२०१९**

## दामिनी मार्शल भरोसा सेल,गुन्हे शाखा पुणे शहर

## एक संशयीत मुलगा चोरीची गाडी व मोबाईलसह पकडले बाबत

दि १७/०७/२०१९ रोजी च्या सुमारास हद्दीमध्ये पेट्रोलींग करत असताना स्वारगेट बस स्टॉप च्या शेजारी असलेले कात्रज बस स्टॉप येथे पायी पेट्रोलींग करत असताना महिलांच्या गर्दीच्या ठिकाणी एक ब्लॅक कलरची पल्सर वरील दोन मुले बसलेला दिसली व गाडी चालवणारा एक मुलगा सदर गाडीवर बसुन मोबाईलवर बोलताना दिसला.व दुसरा मुलगा गाडीच्या शेजारी उभा होता. आम्ही त्याच्या कडे गेलो असता ब्लॅक कलरची पल्सर ही संशयीत वाटत असल्याने सदर गाडीवर बसलेल्या मुलास लायसन्स व त्यांचे नाव, पत्ता विचारले असता त्यांने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांना नंबर प्लेट व गाडीची कागदपत्रे कुठ आहे.असे विचारले असता माझ्या गाडीचा अपघात झाल्यामुळे नंबर प्लेट तुटुन गेली व गाडीची कागदपत्रे भावाकडे आहेत असे सांगीतले. त्यांच्यामुळे आम्ही सदर मुलास गाडीची पावती करण्यासाठी ट्राफीक कर्मचारी पो हवा १४८ खिरड स्वारगेट वाहतुक विभाग यांना बोलावुन सदर गाडीची पावती करायची असल्याबाबत त्यांना सांगीतले.गाडीच्या समोरील नंबर हा नॉट फाउड असा दिसला.सदर मुलास आम्ही ट्राफीक पोलीसांच्या मदतीने स्वारगेट पोलीस स्टेशन ये़थे घेऊन येत असताना मुलगा नामे हड्या सुभराव भोसले हा आमच्या हाताला हिसका देवुन पळुन गेला.तेव्हा आम्ही लागलीच कंट्रोल ला फोन करुन स्वारगेट मार्शल पो शि ८८९८ चिरमे व पो शि ८३४१ पवार यांची मदत घेवुन सदर गाडी व मुलगा नामे सतिश काळे यास ताब्यात घेवुन स्वारगेट पोलीस स्टेशन येथे घेवुन आलो.तेव्हा ट्राफीक पोलीसांनी गाडीचा नंबर चुकीचा आहे.व चासी नंबर ,इंजीन नंबर हा नंबर प्लेट शी मॅच होत नाही असे सांगीतले असता आम्ही सदर गाडी व मुलगा नामे विशाल यास स्वारगेट पोलीस स्टेशन हद्दीतील तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक कदम सो यांच्याकडे चौकशी करण्यासाठी ताब्यात दिले. नंतर आम्ही मुलगा नामे हड्या यास शोधण्यासठी स्वारगेट बस स्टॉप येथे गेलो असता तो मिळुन आला नाही.सदर बाबत आम्ही स्टेशन डायरीस नोंद केलेली आहे.